# बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी

कु. श्रद्धा दहिवलकर
कृषी पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनी (कृषी कीटकशास्त्र)
डॉ. बा.सा.कों.कृ.वि., दापोली

कु. शिल्पा राठोड
वनशास्त्र पदवी विद्यार्थिनी
वनशास्त्र महाविद्यालय, दापोली

उत्पादन वाढीसाठी आणि पेरलेल उगवण्यासाठी शेतकऱ्यानी हंगामाच्या सुरवातीपासूनच सतर्क असणे गरजेचे आहे. त्यामुळे खत, बी-बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यानी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. दरवर्षी पेरणी नंतर उगवलेच नाही किंवा उगवले तर फलधारणा झालीच नाही अशा एक ना अनेक तक्रारी कृषी विभागाकडे दाखल होतात. पण बियाण्याची खरेदी करताना योग्य ती काळजी न घेतल्यामुळे कृषी विभागालाही कारवाई करता येत नाही. त्यामुळे सुरवातीपासूनच शेतकऱ्यानी सतर्क राहिले तर त्याचा फायदा होणार आहे. त्यासाठी बियाणे खरेदी करताना पुढील काळजी घ्यावी:

- बियाण्याची खरेदी करताना कंपनीचे प्रतिनिधी किंवा विक्रेते यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून खरेदी करू नये. तसेच, कंपन्यांच्या जाहिराती वाचूनही बियाण्याची खरेदी करू नये. बियाणे अभ्यासपूर्वक खरेदी करावे.
- खरेदी करावयाच्या बियाणे वाणाची आपल्या भागासाठी शिफारस केली आहे का, हे जाणून घ्यावे. निवडलेला वाण कोणत्या किडीसाठी अथवा रोगासाठी प्रतिकारक्षम किंवा व सहनशील आहे का, याची माहिती घ्यावी.
- निवडलेला वाण किती कालावधीचा आहे? त्याची वैशिष्ट्ये कोणती? भाजीपाला बियाण्याच्या बाबतीत तो वाण कोणत्या हंगामासाठी शिफारस केलेला आहे व कोणत्या कालावधीपर्यंत लागवड करायचा, हे जाणून घ्यावे. शिफारस केलेला लागवड कालावधी गेल्यानंतर लागवड करू नये.
- वाणाची निवड करताना जमिनीचा प्रकार, हवामान, लागवडीचे अंतर, कोरडवाहू / बागायत यांचा विचार करावा. वाणाची निवड करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.
- खासगी क्षेत्रातील संशोधित केलेले ट्रूथफुल (सत्यतादर्शक) बियाणे निवडायचे असेल, तर एकच वाण सर्व क्षेत्रासाठी न निवडता क्षेत्राप्रमाणे दोन-तीन वाण निवडावेत. अधिक उत्पादनाचे प्रलोभन कुणी दाखविल्यास व ते वाण अपरिचित असतील, तर निवड करू नये. यातून फसगत होउ शकते. अशा अपरिचित जातीपासून नवीन कीड व रोगांचा आपल्याकडे शिरकाव होउ शकतो.
- खरेदी केलेल्या बियाण्याची विक्रेत्याकडून पक्की पावती घ्यावी. यात अंतिम तारीख, शेतकऱ्याचे नाव, पूर्ण पत्ता इ. स्पष्ट लिहावे. पावतीवर विक्रेत्याची व शेतकऱ्याची सही असणे आवश्यक आहे.
- बियाण्याच्या पिशवीवरील किमतीपेक्षा जास्त भावात बियाणे खरेदी करू नये. पिशवीवर किंमत छापली नसल्यास किंवा आहे त्या किमतीपेक्षा दुकानदार जास्त पैसे मागत असल्यास जिल्हा वजनमापे निरीक्षकांकडे तक्रार करावी. छापलेल्या किमतीपेक्षा जास्त पैसे घेणे गुन्हा आहे.
- प्रमाणित (सर्टिफाईड) बियाण्याची पिशवी तिन्ही बाजूंनी आतून शिवलेली असते. वरच्या बाजूने प्रमाणपत्र शिवलेले असते व त्याला सील लावलेले असते. अलीकडे प्लॅस्टिक बॅगमध्ये बियाणे उपलब्ध होत आहे. त्यालाही पॅकिंग असते व त्यावर आवश्यक मजकूर छापलेला असतो.
- बियाणे खरेदी करताना लेबलवरील माहिती पाहावी. लेबलवर पिकाचे नाव, जात, उगवणशक्ती, भौतिक व आनुवंशिक शुद्धता, टक्केवारी, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीजप्रक्रियेला वापरलेले रसायन ही सर्व माहिती वाचून घ्यावी.
- बियाणे खरेदी बिलावर छापील बिल क्रमांक असावा. पेरणीवेळी पिशवी खालच्या बाजूने फोडावी. त्यामुळे पिशवीवर असलेले लेबल व बीज प्रमाणिकरण यंत्रणेचा टॅग व्यवस्थित राहतील.
- मुदतबाह्य तसेच पॅकिंग फोडलेले सुटे बियाणे खरेदी करू नये. सरळ वाणाचे बियाणे दरवर्षी खरेदी करून उत्पादन खर्च वाढवू नये. एकदा पिशवीतले बियाणे खरेदी केल्यानंतर त्यापासून चांगले बियाणे करून ते तीन ते चार वर्षे वापरता येते. वजनाविषयी शंका आल्यास ते वजन करूनच घ्यावे.
- पेरणीनंतर टॅगसह रिकामी पिशवी, बिल जपून ठेवावे. रिकाम्या पिशव्या, डबे यांची विक्री करू नये.
- बियाण्याची खरेदी शासनमान्य / परवानाधारक विक्रेत्याकडूनच करावी. बियाण्याविषयी काही तक्रार असल्यास जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी यांना लेखी तक्रार द्यावी.

(संपर्क: +९१ ७६६९९७९१५)

★ ★ ★

## करडई पिकावरील मर रोग

हा रोग फ्यूजेरियम या बुरशीमुळे होतो आणि रोगाची लागण जमिनीतून होते. पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थेत हा रोग येउ शकतो. या रोगामुळे रोपे प्रथम कोमेजतात, पिवळी पडतात वाळतात व मरतात. फुलोऱ्याच्या अवस्थेत पूर्ण झाड मरते किंवा अर्धा भाग मरतो व अर्ध अभाग हिरवा राहतो. मारग्रस्त झाडाची मुळे उभी कापून पाहील्यास मध्यभागातील गाभा बुरशीची वाढ झाल्यामुळे तपकिरी दिसतो.

उपाय:

पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. पिकांची फेरपलट करावी. मर प्रतिकारक्षम वाणांचा वापर करावा. पेरणीपुर्वी २.५ ग्रॅम थायरम किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रती किलो बियाण्यास प्रक्रिया करावी.